महाराष्ट्र शासन
**शिक्षण उपसंचालक कार्यालय**
नाशिक विभाग, नाशिक
विभागीय आयुक्त कार्यालय आवार, नाशिक रोड, नाशिक

फोन नंबर ०२५३ २४५४८१५.    ईमेल: dydenskest@yahoo.com

जा.क्र. शिउसं/नावि/उमा-१-३/२०२३/ 7409    दिनांक ०/०६/२०२३

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक,
नाशिक विभागातील सर्व उच्च माध्यमिक विदयालये व कनिष्ठ महाविदयालये
(नाशिक महानगरपालिका क्षेत्र वगळून )

विषय : सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी इ. ११ वी इ. १२ वी च्या वर्गात प्रवेशाच्या कार्यप्रणालीबाबत तसेच शैक्षणिक वर्षाच्या कार्यप्रणालीबाबत ..

संदर्भ : १. शासन निर्णय क्र. ०६२१/प्र.क्र. ५२/एस.डी.-२ दि. ११ ऑगस्ट, २०२१
२. शासन निर्णय क्र शाशैशु-२०२१/प्र.क्र. ४७/२१/एसएम-६ दि. १२ ऑगस्ट, २०२१
३. प्रस्तुत कार्यालयाने आयोजित केलेली बैठक दि. ०१/०६/२०२३

उपरोक्त विषयान्वये सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रियेची अंमलबजावणी खालील सूचनांप्रमाणे करावी.

**नाशिक विभाग, नाशिक**
**शैक्षणिक वर्ष २०२३-२४ इ. ११ वी प्रवेशाचे वेळापत्रक**

| अ.क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १. | प्रवेश अर्ज विदयार्थ्यांना वितरीत करणे व विदयार्थ्यांकडून जमा करणे | शालांत परीक्षेचा निकाल गुणपत्रक मिळाल्याचा दिवस धरुन कामकाजाच्या चौथ्या दिवसांपर्यंत दिनांक : ----------------- ते ------------------- |
| २. | अर्जाची छाननी करणे, संवर्ग निहाय प्राप्त अर्जानुसार सर्व विदयार्थ्यांची यादी तयार करणे. | सातवा दिवस संध्याकाळी ४ वाजेपर्यंत दिनांक : ------------------------- |
| ३. | पहिली संवर्गनिहाय गुणवत्ता यादी व प्रतिक्षा यादी तयार करुन ती यादी प्रदर्शित करणे | सातवा दिवस संध्याकाळी ४ वाजेपर्यंत दिनांक : ------------------------- |
| ४. | पहिल्या गुणवत्ता यादीतील विदयार्थ्यांना प्रवेश देणे | कामकाजांच्या दहाव्या दिवसांपर्यंत दिनांक : ------------------------- |
| ५. | रिक्त जागी दुसऱ्या प्रतिक्षा यादीतील विदयार्थ्यांची प्रवेश यादी जाहिर करणे | कामकाजांच्या अकराव्या दिवसांपर्यंत दिनांक : ------------------------- |
| ६. | रिक्त जागी दुसऱ्या यादीतील विदयार्थ्यांना प्रवेश देणे | दिनांक : ------------------------- |
| ७. | रिक्त जागी तिसऱ्या प्रतिक्षा यादीतील विदयार्थ्यांची प्रवेश यादी जाहिर करणे. | दिनांक : ----------------------- रोजी सायं ४.०० वाजेपर्यंत |
| ८. | रिक्त जागी तिसऱ्या प्रतिक्षा यादीतील विदयार्थ्यांना प्रवेश देणे | दिनांक : --------------------------------- |
| ९. | रिक्त जागी चौथ्या प्रतिक्षा यादीतील विदयार्थ्यांची प्रवेश यादी जाहिर करणे. | दिनांक : ---------------------- रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत |
| १०. | रिक्त जागी चौथ्या प्रवेश यादीतील विदयार्थ्यांना | कामकाजांच्या चौदाव्या दिवसांपर्यंत |

Scanned with AltaScanner

| | | |
|---|---|---|
| | प्रवेश देणे व प्रतिक्षा यादीतील विदयार्थ्यांना प्रवेश देवूनही शिल्लक राहिलेल्या जागा प्राप्त प्रवेश अर्जानुसार गुणानुक्रमे भरणे | दिनांक : ------------------------- |
| ११. | मा. शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे प्रवेशासाठी प्राप्त झालेल्या अर्जाची यादी व संवर्गनिहाय यादी प्रवेश दिलेल्या दिनांकासह सादर करणे. | कामकाजांच्या पंधराव्या दिवशी दुपारी १२.०० वाजेपर्यंत<br>दिनांक : ------------------------- |
| १२. | प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही शिल्लक राहिलेल्या जागांवर प्रवेश देणे | कामकाजांच्या विसाव्या दिवसांपर्यंत<br>दिनांक : ------------------------- |

प्राचार्य यांनी आपल्या कनिष्ठ महाविदयालयातील इ. १२ वीत झालेल्या शाखानिहाय माहिती या कार्यालयात दिनांक ३०/०९/२०२३ पूर्वी व इ. ११ वी तील प्रवेशाची माहिती सोबतच्या नमुन्यात कामकाजाच्या २० व्या दिवशी तसेच २५ व्या व ३० व्या दिवशी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे पाठवावी व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी dydenskest.jrc@yahoo.com ई-मेलवर पाठवावी.

टिप : - इ. ११ वी प्रवेश प्रक्रिया - अनुदानित उच्च माध्यमिक विदयालयांनी सर्वप्रथम अनुदानित वर्ग/तुकडया मधील प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी. त्यानंतरच विना अनुदानित वर्ग/तुकडया मधील प्रवेश प्रक्रिया सुरु करावी.

( डॉ. बी. बी. चव्हाण )
शिक्षण उपसंचालक,
नाशिक विभाग, नाशिक

Scanned with AltaScanner

प्रपत्र - अ

इ. ११ वी तील प्रवेशाच्या माहितीचा नमुना

कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव :-

इ. ११ वी प्रवेशाबाबतची माहिती २०२३-२४

अ. प्रवेशाबाबत गोषवारा :-

| झालेल्या प्रवेशांची संख्या | इ. ११ वी | | | | | इ. १२ वी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कला | विज्ञान | वाणिज्य | संयुक्त | एकूण | कला | विज्ञान | वाणिज्य | संयुक्त | एकूण |
| २० दिवशी | | | | | | | | | | |
| २५ दिवशी | | | | | | | | | | |
| ३० दिवशी | | | | | | | | | | |

ब. शाखानिहाय माहितीचा गोषवारा :-

| अ. क्र. | तपशील | अनुदानित/विना अनुदानित/स्वयं अर्थ सहाय्यित | तुकडी संख्या/ क्षमता | कला | विज्ञान | वाणिज्य | संयुक्त | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रवेशासाठी निर्गमित केलेल्या आवेदनपत्राची संख्या | | | | | | | |
| २. | प्रवेशासाठी प्राप्त आवेदन पत्रांची संख्या | | | | | | | |
| ३. | दिनांक : / /२०२३ पर्यंत दिलेले प्रवेश | | | | | | | |
| ४. | दिनांक : / /२०२३ पर्यंत शिल्लक प्रवेश क्षमता | | | | | | | |
| ५. | दिनांक : / /२०२३ पर्यंत दिलेले जादा प्रवेश | | | | | | | |
| ६. | जादा तुकडी मागणीसाठी शिक्षणाधिकारी (माध्य) यांचेकडे प्रस्ताव दिलेला आहे काय ? असल्यास कितव्या तुकडीची मागणी केलेली आहे. | | | | | | | |

क. प्रवर्गनिहाय माहितीचा गोषवारा :-

| क्र. | तपशील | SC | ST | VJ-A | NT-B | NT-C | NT-D | SBC | OBC | EWS | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या | | | | | | | | | | |
| २. | प्रवर्गनिहाय प्रवेश क्षमता | | | | | | | | | | |

Scanned with AltaScanner

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | प्रथम यादीतील शेवटचा गुणांक | | | | | | | | | | |
| ४. | दिनांक : --/--/२०२३ पर्यंतचा शेवटचा गुणांक ----- | | | | | | | | | | |
| ५. | दिनांक : --/--/२०२३ पर्यंतचा शेवटचा गुणांक ----- | | | | | | | | | | |
| ६. | प्रवर्गानुसार कमी असलेले प्रवेश | | | | | | | | | | |
| ७. | प्रवर्गानुसार जादा असलेले प्रवेश | | | | | | | | | | |

१. प्रवेशाबाबतचे प्राचार्यांचा अभिप्राय :-

**प्राचार्य/मुख्याध्यापक**
**मोबाईल क्रमांक**

Scanned with AltaScanner

**सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी इ. ११ वी च्या वर्गात प्रवेश देण्यासंबंधी करावयाची कार्यवाहीबाबत सूचना :-**

**अ. इयत्ता ११ वी प्रवेशाबाबत सर्वसाधारण सूचना :-**

१. शासन निर्णय क्रमांक एचएससी/१०९७/१४४४/९७ उमाशि-१ दि. ०४/०६/१९९७ तसेच दिनांक २६/०६/१९९७, २५/०६/१९९८, २६/०६/२००८, दि. १२/०८/२०२१ अन्वये इ. ११ वी प्रवेश केवळ गुणवत्तेच्या आधाराने प्रवेशोच्छुक विदयार्थ्यांना प्रवेश देता येतील.

२. एखादया विदयार्थ्यास एकापेक्षा अनेक शाखांमधून प्रवेश प्रक्रिया होणे अपेक्षित असल्यास, त्याने प्रत्येक शाखेतील प्रवेशासाठी स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

३. प्रत्येक अर्जदार विदयार्थ्याने आवश्यकतेनुसार आपल्या प्रवेश अर्जावर शाखा, जातीचा प्रवर्ग, कोणत राखीव जागेसाठी अर्ज केला याची स्पष्ट नोंद केलेली असावी.

४. गुणवत्ता यादी तयार करतांना मागासवर्गीयांसाठी निर्धारित करण्यात आलेल्या आरक्षणाबाबतच्या प्रचलित आदेशांचे पालन करणे प्राचार्यावर बंधनकारक राहील.

५. कमी गुण आहे या कारणास्तव विदयार्थ्याचा प्रवेश अर्ज नाकारु नयेत.

६. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालयाने प्रवेशासाठी प्राप्त झालेल्या विदयार्थ्यांच्या प्रवेश यादी व गुणवत्ता यादी सूचना फलकावर दर्शनी जागेवर लावण्यात याव्यात.

७. वरील दोन्ही यादयांच्या प्रती शिक्षण उपसंचालक कार्यालय नाशिक व शिक्षणाधिकारी कार्यालय यांच्याकडे विहित मुदतीत सादर कराव्यात.

८. उपरोक्त यादीची मागणी पालकांनी/विदयार्थ्यांनी अगर इतर नागरीकांनी केल्यास प्रत्येक पृष्टासाठी ५.०० रुपये शुल्क घेवून संबंधितांना यादी यावी.

९. विदयार्थ्यांकडून प्रवेश अर्ज प्राप्त झाल्यावर त्यास अर्ज स्विकारल्याची पोहच दयावी.

१०. विज्ञान शाखेस प्रवेश देतांना संबंधित विदयार्थ्यांस शालांत प्रमाणपत्र परीक्षेत विज्ञान विषयांमध्ये ३५ टक्के गुण असणे आवश्यक आहे.

११. प्रवेश क्षमता - वरीष्ठ महाविदयालय संलग्न १२० माध्यमिक शाळेस संलग्न ८० याप्रमाणे राहील. (एक तुकडीमागे)

१२. जातीच्या प्रमाणपत्रासाठी पत्रासाठी प्रवेश अर्ज नाकारु नयेत, तसेच शाळा सोडल्याच्या दाखल्यावर जी नोंद असेल ती ग्राहय धरावी. जातीचे प्रमाणपत्र सादर न केल्यास प्रवेश रदद करण्यात येईल, असे हमीपत्र पालकांकडून घेण्यात यावे.

१३. प्रचलित शासन निर्णयानुसार इ. ११ वी चे प्रवेश देण्याचे अधिकार प्राचार्यांना आहेत. कनिष्ठ महाविदयालयात जागा रिक्त नाहीत. म्हणून विदयार्थ्यांना या कार्यालयाकडे न पाठविता ज्या कनिष्ठ महाविदयालयात जागा रिक्त असतील तेथे चौकशी करणेबाबत सूचना दयाव्यात.

१४. एकाच वेळी दोन टिकाणी नियमित प्रवेश दिले जाणार नाहीत. उदा. आय.टी.आय./शेतकी शाळा आणि इ. ११ वी नियमित वर्गात प्रवेश देता येत नाही.

१५. प्रतिक्षा यादी १० टक्के पेक्षा अधिक नसावी.

१६. शासन निर्णयानुसार कनिष्ठ महाविदयालयांना विना अनुदानित तुकडयांसाठी शुल्क आकारणीबाबत प्रचलित शासन निर्णय व शासन परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी.

१७. विदयार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या अर्जाची गुणानुक्रमानुसार यादी आरक्षणांनुसार प्रत्यक्ष गुणवत्ता यादी, प्रतिक्षा यादी, दर्शनी भागावर पालक व विदयार्थी यांच्या माहितीसाठी विहित नमुन्यात लावण्यात यावी.

१८. प्राचार्य यांना शालेय स्तरावर ए. टी. के. टी. मधून प्रवेश देतांना कला, विज्ञान व वाणिज्य शाखांमधील प्रवेशाबाबत कार्यवाही करतांना शासन निर्णय दि. १७ ऑगस्ट, २००९ आणि १ ऑक्टोबर, २००९ मधील सूचनांचे अनुपालन करण्यात यावे.

Scanned with AltaScanner

**सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी इ. ११ वी च्या वर्गात प्रवेश देण्यासंबंधी करावयाची कार्यवाहीबाबत सूचना :-**

**अ. इयत्ता ११ वी प्रवेशाबाबतत सर्वसाधारण सूचना :-**

१. शासन निर्णय क्रमांक एचएससी /१०९७/१४४४/९७ उमाशि -१ दिनांक ०४/०६/१९९७ तसेच दिनांक २६/०६/१९९७, २५/०६/१९९८ २६/०६/२००८, दि. १२/०८/२०२१ अन्वये इयत्ता ११ वी प्रवेश केवळ गुणवत्तेच्या आधाराने प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेश देता येतील.

२. एखादया विद्यार्थ्यास एकापेक्षा अनेक शाखांमधून प्रवेश प्रक्रिया होणे अपेक्षित असल्यास, त्याने प्रत्येक शाखेतील प्रवेशासाठी स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

३. प्रत्येक अर्जदार विद्यार्थ्यांने आश्यकतेनुसार आपल्या प्रवेश अर्जावर शाखा, जातीचा प्रवर्ग, कोणत्या राखीव जागेसाठी अर्ज केला याची स्पष्ट नोंद केलेली असावी.

४. गुणवत्ता यादी तयार करतांना मागासवर्गीयांसाठी निर्धारीत करण्यात आलेले आरक्षणाबाबतच्या प्रचलित आदेशांचे पालन करणे प्राचार्यावर बंधनकारक राहील.

५. कमी गुण आहे या कारणास्तव विद्यार्थ्यांचा प्रवेश अर्ज नाकारु नयेत.

६. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने प्रवेशासाठी प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश यादी व गुणवत्ता यादी सूचना फलकावर दर्शनी जागेवर लावण्यात याव्यात.

७. वरील दोन्ही यादयांच्या प्रती शिक्षण उपसंचालक कार्यालय, नाशिक व शिक्षणाधिकारी कार्यालय यांच्याकडे विहीत मुदतीत सादर कराव्यात.

८. उपरोक्त यादीची मागणी पालकांनी/विद्यार्थ्यांनी अगर इतर नागरीकांनी केल्यास प्रत्येक पृष्ठासाठी ५.०० रुपये शुल्क घेवून संबंधितांना यादी द्यावी.

९. विद्यार्थ्यांकडून प्रवेश अर्ज प्राप्त झाल्यावर त्यास अर्ज स्विकारल्याची पोहच दयावी.

१०. विज्ञान शाखेस प्रवेश देतांना संबंधित विद्यार्थ्यास शालांत प्रमाणपत्र परीक्षेत विज्ञान विषयांमध्ये ३५ टक्के गुण असणे आवश्यक आहे.

११. प्रवेश क्षमता वरिष्ठ महाविद्यालय संलग्न १२० माध्यमिक शाळेसंलग्न ८० याप्रमाणे राहील. (एक तुकडीमागे)

१२. जातीच्या प्रमाणपत्रासाठी पत्रासाठी प्रवेश अर्ज नाकारु नयेत, तसेच शाळा सोडल्याच्या दाखल्यावर जी नोंद असेल ती ग्राहय धरावी. जातीचे प्रमाणपत्र सादर न केल्यास प्रवेश रदद करण्यात येईल असे हमीपत्र पालको कडून घेण्यात यावे.

१३. प्रचलित शासन निर्णयानुसार इ. ११ वीचे प्रवेश देण्याचे अधिकार प्राचार्यांना आहेत. कनिष्ठ महाविद्यालयात जागा रिक्त नाहित म्हणुन विद्यार्थ्यांना या कार्यालयाकडे न पाठविता ज्या कनिष्ठ महाविद्यालयात जागा रिक्त असतील तेथे चौकशी करणेबाबत सुचना दयाव्यात.

१४. एकाच वेळी दोन ठिकाणी नियमित प्रवेश दिले जाणार नाहीत. उदा. आय.टी.आय./शेतकी शाळा आणि इयत्ता ११ वी नियमित वर्गात प्रवेश देता येत नाही.

१५. प्रतिक्षा यादी १० टक्के पेक्षा अधिक नसावी.

१६. शासन निर्णयानुसार कनिष्ठ महाविद्यालयांना विना अनुदानित तुकडयांसाठी शुल्क आकारणीबाबत प्रचलित शासन निर्णय व शासन परिपत्रानुसार कार्यवाही करण्यात यावी.

१७. विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या अर्जाची गुणानुक्रमानुसार यादी आरक्षणानुसार प्रत्यक्ष गुणवत्ता यादी प्रतिक्षा यादी, दर्शनी भागावर पालक व विद्यार्थी यांच्या माहितीसाठी विहीत नमुन्यात लावण्यात यावी.

१८. प्राचार्य यांना शालेय स्तरावर ए.टी.के.टी. मधून प्रवेश देतांना कला, विज्ञान व वाणिज्य शाखंमधील प्रवेशाबाबत कार्यवाही करतांना शासन निर्णय दि. १७ ऑगस्ट २००९ आणि ०१ ऑक्टोबर २००९ मधील सुचनांचे अनुपालन करण्यात यावे.

**ब. ११ वीची प्रवेश प्रक्रिया राबवितांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निकषानुसार करावयाच्या कार्यवाहीबाबतच्या सूचना.**

१. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र दि. ०२/०६/२००८ अन्वये ज्या विद्यार्थ्यांनी इ. ९ वी व १० वी मध्ये सामान्य गणित हा अभ्यासक्रम घेतला

Scanned with AltaScanner

होता. त्या विद्यार्थ्यांनी इ. ११ वी कला, वाणिज्य अथवा विज्ञान शाखेतील गणित विषय घेता येणार नाही.

२. शासन निर्णय दि. २५/०२/२०१० नुसार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माहे मार्च २०१० पासून घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सर्वोत्तम -५ योजना लागू करण्यात आलेली आहे. त्यानुसार शासन निर्णयातील अटीनुसार गुणवत्ता यादी तयार करावी.

३. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाव्यतिरिक्त दुसऱ्या मंडळांची शालांत परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी इंग्रजी विषय घेतलेला नसल्यास ते विद्यार्थी महाराष्ट्रात इयत्ता ११ वी प्रवेशास अपात्र असतात.

**क) अनुदानित, विना अनुदानित, कायम विनाअनुदानित उच्च माध्यमिक विद्यालयांनी व कनिष्ठ महाविद्यालयांनी वर्ग/तुकडया असलेल्या उच्च माध्यमिक विद्यालयांनी व कनिष्ठ महाविद्यालयांनी शुल्क निश्चीती व अंमलबजावणीबाबत अनुसरावयाच्या कार्यपध्दती विषयी सुचना.**

१. शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांना देणगी घेवून प्रवेश देणे ही महाराष्ट्र एज्युकेशनइन्स्टिटयुशन्स प्रोहिबेशन ऑफ कॅपिटेशनफी ॲक्ट १९८७ मधील तरतुदीनुसार गुन्हा आहे याची सर्वांनी नोंद घ्यावी.

२. सर्व अनुदानित, विना अनुदानित किंवा कायम विना अनुदानित उच्च माध्यमिक विद्यालये व कनिष्ठ महाविद्यालये चालविणाऱ्या शैक्षणिक संस्थासाठी, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११ हा सन २०१४ चा अधिनियम क्रमांक ७ अन्वये दिनांक २१ मार्च २०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेला आहे. या अधिनियमातील कलम ६ (२) नुसार फी चे निश्चितीकरण करुन घ्यावे.

३. २१ मार्च २०१४ मधील अधिनियमातील कलमांनुसार विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करून सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी आकारावयाच्या फी चे विहीत मुदतीत निश्चीतीकरण करणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणे कार्यवाही न करणाऱ्या शाळा या अधिनियमातील कलम १६ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

४. राज्यात शासन निर्णय दिनांक ०६ मार्च १९८६ अन्वये इ.१ ली ते इ.१२ वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफतशिक्षण देण्याची योजना सुरु आहे. त्यानुसार अनुदानित उच्च माध्यमिक विद्यालयांनी व कनिष्ठ महाविद्यालयांनो मुलांकडून उ.मा. शालांत प्रमाणपत्र परीक्षा फी खेरीज कोणतीही फी आकारू नये.

५. तथापि विनाअनुदानित किंवा कायम विनाअनुदानित असलेल्या उच्च माध्यमिक विद्यालयांनी व कनिष्ठ महा विद्यालयांनी अथवा विना अनुदानित किंवा कायम विनाअनुदानित तुकड्या सुरु असलेल्या अनुदानित उच्च माध्यमिक विद्यालयांनी व कनिष्ठ महाविद्यालयांनी सन २०२१-२२ साठी अंतीम मान्य करण्यात आलेल्या फी मधुल शासनाकडुन प्रतिपुर्तीने मिळणारी रक्कम वजा जाता उर्वरित स्विकारावयाची फी व उ.मा. शालांत प्रमाणपत्र परीक्षा फ़ी सोडुन इतर कोणतीही फी आकारू नये. सदर बाबतीत फीच्या प्रतिपुर्तीसाठी संबंधित शाळांनी शासन निर्णय दि. ६ मार्च, १९८६ मधील परिच्छेद ३ नुसार कार्यवाही करावी.

६. मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी ची प्रतिपूर्ती शासनामार्फत होत असल्याने मागास वर्गीय विद्यार्थ्याबाबत शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी.

७. शासन पत्रात नमुद केल्याप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयाचे माहिती पत्रकाची किंमत आकारण्यात येत नसल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आलेले आहे. सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षी कनिष्ठ महाविद्यालयाच्या माहिती पत्रकाची किंमत जास्तीत जास्त रुपये १०/- ठेवता येईल.

८. शासन निर्णय दि. १२/०८/२०२१ नुसार सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी एकवेळेची बाब म्हणुन सर्व मंडळाच्या व सर्व माध्यमांच्या शाळांना मुद्दा क्रं. १ ते १२ प्रमाणे दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करावी.

**<u>इयत्ता १२ वी प्रवेश न देण्याबाबत सर्वसाधारण सूचना</u>**

१. विज्ञान शाखा इयत्ता ११ वी कला, वाणिज्य, किमान कौशल्य व्यवसाय शिक्षण उत्तीर्ण विद्यार्थी तसेच इयत्ता १२ वी कला, वाणिज्य, किमान कोशल्य, व्यवसाय शिक्षण अनुत्तीर्ण विद्यार्थी

२. वाणिज्य शाखा इयत्ता ११ वी कला किमान कौशल्य व्यवसाय शिक्षण उत्तीर्ण विद्यार्थी तसेच इयत्ता १२ वी कला, किमान कौशल्य, व्यवसाय शिक्षण अनुत्तीर्ण विद्यार्थी

Scanned with AltaScanner

३. कला शाखा इयत्ता ११ वी कला किमान कौशल्य व्यवसाय शिक्षण उत्तीर्ण विद्यार्थी तसेच इयत्ता १२ वी कला. : किमान कोशल्य, व्यवसाय शिक्षण अनुत्तीर्ण विद्यार्थी.

४. इ.१२ वी कोणत्याही शाखेत उत्तीर्ण झालेला विद्यार्थी.

५. इयत्ता ११ वी उत्तीर्ण झालेला अथवा इ.१२ वी नापास / अनुत्तीर्ण झालेला परंतु दोन किंवा त्यापेक्षा अधिक वर्षाचा खंड असणारा विद्यार्थी.

६. इ.१२ वी नापास विद्यार्थ्यास लगतच्या वर्षात इ.१२ वीच्या त्याच विद्याशाखेत पुर्नः प्रवेश घेता येईल. मात्र त्यानंतर किंवा दोन पेक्षा अधिक वर्षाचा खंड असणारे विद्यार्थी प्रवेशास पात्र ठरत नाहीत.

**ड) इयत्ता ११ वी प्रवेशासाठी सामाजिक आरक्षण, खेळाडूसाठी आरक्षण कोटा विषयक माहिती १. इ.१९ वीत प्रवेश देतांना प्रचलित नियमानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश देणे बंधनकारक आहे. १. वैधानिक / सामाजिक आरक्षणांतर्गत राखीव जागा**

| क्र. | प्रवर्ग | रायगड वगळून इतर सर्व क्षेत्र |
|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती (SC) | 13 % |
| २. | अनुसूचित जमाती (ST) | 07 % |
| ३. | विमुक्त जाती अ (VJ-A ) | 03 % |
| ४. | भटक्या जमाती व (NT-B ) | 2.5 % |
| ५. | भटक्या जमाती क (NT-C) | 3.5 % |
| ६. | भटक्या जमाती ड (NT-D ) | 2 % |
| ७. | विशेष मागास प्रवर्ग (SBC) | 2 % |
| ८. | इतर मागासवर्गीय (OBC) | 19 % |
| ९. | आर्थिक दुर्बल घटक (EWS) | 10 % |

**(नाशिक विभागातील ज्या जिल्हांत पेसा क्षेत्र लागु आहे. अशा क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांचा प्रवेशाचे आरक्षण पेसा क्षेत्राप्रमाणे करावे. तसेच शासन निर्णय दि. २८/०२/२०२३ प्रमाणे आरक्षणावावत अंमलबजावणी करावी.)**

विशेष आरक्षण महिला ३०% दिव्यांग व अपंग ४% प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त ५%

अ. बदलीने आलेले राज्यशासन /केंद्रशासन / खाजगी क्षेत्रातील आलेले कर्मचारी यांचे पाल्य

व. आजी/माजी सैनिकांच्या पत्नी/पाल्य, स्वतंत्र सैनिकांचे पाल्य,

क. आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धामध्ये विजेते/ सहभागी खेळाडू विद्यार्थी व राष्ट्रीय स्तरावरील स्पधामध्ये पदक विजेते खेळाडू या सर्वांना मिळून ५%, अनाथ मुले खुल्या प्रवर्गातून १%

टिप:- १. समांतर आरक्षण हे कप्पीकृत असल्याने उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये जागा निश्चित करताना केवळ सामाजिक आरक्षणाची संख्या नमूद न करता समांतर आरक्षणाच्या जागांची निश्चिती करून घेतली जाईल.

२. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १३/०८/२०१४ च्या परिपत्रकानुसार समांतर आरक्षणाच्या जागा संबंधित सामाजिक आरक्षणाच्या प्रवर्गातून भरणे आवश्यक आहे.

३. सामाजिक व समांतर आरक्षणानुसार विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०५/१२/२०१४ च्या शासन निर्णयानुसार उर्वरीत रिक्त जागा नियमित अंतिम फेरीपूर्वी परिवर्तित करण्यातयेतील, तदनुसार सदर जागा गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

**२. इन हाऊस कोटा** ज्या संस्थेमार्फत कनिष्ठ महाविद्यालय चालविण्यात येत आहे. त्याच परिसरातील संस्थेच्या माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यासाठी १० टक्के जागा राखून ठेवून त्या जागांवर गुणवत्तेनुसार प्रवेश द्यावेत.

**३. *अल्पसंख्यांक कोटा*** शासन निर्णय दि. २६/६/१९९७ व २५६-१९९८ अन्वये ज्या शैक्षणिक संस्था अल्पसंख्याक (धार्मिक/भाषिक) व्यवस्थापनातर्फे चालविल्या जातात अशा शैक्षणिक संस्थानी त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयातील एकूण प्रवेश क्षमतेच्या ५० टक्के जागा संबंधीत अल्पसंख्याक (धार्मिक / भाषिक) विद्यार्थ्यांकडून गुणवत्तेच्या आधारे भराव्यात. उर्वरित ५० टक्के जागा इतर संवर्गातून गुणवत्तेच्या आधारे भराव्यात.

Scanned with AltaScanner

**४. संस्था व्यवस्थापन ५ टक्के जागा** संस्थेत प्राप्त झालेल्या अर्जानुसार गुणनुक्रमे प्रवेश द्यावेत. ५ ६. जातीच्या प्रमाणपत्रासाठी प्रवेश अर्ज नाकारु नयेत तसेच शाळा सोडल्याच्या दाखल्यावर जी नॉद असेल ती ग्राहय घरावी. जातीचे प्रमाणपत्र सादर न केल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल. पाची मला जाणीव आहे असे हमीपत्र पालाकाकडून घ्यावे.

८. शाळा सोडल्याच्या दाखल्यावर जातीची नोंद नरोल व जातीचे प्रमाणपत्र नसले तर त्या विद्यार्थ्यास खुला समजण्यातयावा.

९. प्रवेश अर्जात शाखा, जातीचा प्रवर्ग, राखीव जागेसाठीचा अर्ज याची स्पष्टता असावी.

१०. विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या अर्जाची गुणासह यादी, आरक्षणानुसार प्रत्यक्ष गुणवत्ता यादी प्रतिक्षा यादी, दर्शनी भागावर पालक व विद्यार्थी यांच्या माहितीसाठी विहित नमुन्यात लावण्यात यावी.

| क्र | विद्यार्थ्याचे पूर्ण नाव | सर्वोत्तम ५ योजनेचे एकूण गुणानुक्रमे | सर्वोत्तम ५ योजनेची टक्केवारी गुणानुक्रमे |
|---|---|---|---|

११. शासनाने आरक्षण धोरणात वेळोवेळी कळविलेल्या बदलानुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येईल

१२. कोणत्याही एखादया मागासलेल्या वर्गाकरी ता राखीव जागा त्या वर्गातील विद्यार्थी पुरेशा संख्येने उपलब्ध न झाल्याने रिकाम्या राहिल्या तर त्या जागा अन्य मागासलेल्या प्रकारातील विद्यार्थ्यांना प्रवेश देवून भरण्यात याव्यात व असे केल्यामुळे एखादया विशिष्ट वर्गाच्या वर्गासाठी राखीव जागांपैकी काही जागा त्या वर्गाचे पुरेशे विद्यार्थी उपलब्ध न झाल्यामुळे रिकाम्या राहिल्या तर अराखीव म्हणून समजण्यात याव्यात व त्याजागांवर खुला संवर्गातून गुणवत्तेनुसार भरण्यात याव्यात.

**काही उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक / प्राचार्य नियमबाहय प्रवेश देतात व शिबिरात प्रवेश रद्द केल्यानंतर विद्यार्थ्यांना परवानगीसाठी या कार्यालयकडे वा शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे पाठवित असतात मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार (शासन निर्णय दिनांक ४ जून १९९७, २६ जून, १९९७, जुलै १९९७ व २५ जून १९९८) प्रवेश देणे बाबत उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक / प्राचार्य सक्षम आहेत.**

नियमबाहय प्रवेश दिल्यास मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्या विरुध्द प्रशासकिय कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. काही मुख्याध्यापक / प्राचार्य, किमान कोशल्य, व्यवसाय शिक्षणाकडील विद्याथी सामान्य शिक्षणाकडे दाखवुन दोनही बाजूने कार्यभार मंजुर करुन घेतात. त्यामुळे ते शिक्षण विभागाची फसवणुक होण्यास जबाबदार ठरतात. तसे आढळून आल्यास मुख्याध्यापक / प्राचायांना व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल व त्यांचे विरुध्द प्रशासकिय कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**( डॉ. बी. बी. चव्हाण )**
**शिक्षण उपसंचालक,**
**नाशिक विभाग, नाशिक**

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म. रा. पुणे

Scanned with AltaScanner